**प्रेसनोट** **दि.०७/०८/२०१९**

## सिंहगडरोड पोलीस स्टेशन,पुणे शहर

## पोलीस मित्र, मुस्लिम बांधव व मोहल्ला समिती सदस्य यांची पोलीस स्टेशन या ठिकाणी आगामी बकरी ईद या सणाचे अनुषंगाने मिटींग

दि. ०६/०८/२०१९ रोजी १९.०० ते १९.४५ वा. चे दरम्यान आगामी बकरी ईद, गणेशोत्सव व दहीहंडी या कार्यक्रमांचे अनुषंगाने सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे सिंहगड रोड पोलीस स्टेशन हद्दीतील मुस्लीम बांधवांची बकरी ईद सणाचे निमीत्त मिटींग आयोजीत केली होती. सदर मिटींगमध्ये आगामी बकरी ईद सणाचे अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. दुर्योधन पवार यांचे मार्गदर्शन्वये पोलीस निरीक्षक (गुन्ह) श्री. दादा गायकवाड यांनी बकरी ईद सण साजरा करताना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याबाबत दक्षता घेण्याबाबत तसेच बकरी ईद सण उत्सहात पण शांततेत पार पाडणेबाबत सखोल सुचना व मार्गदर्शन केले. सदर मिटींगला ६ मुस्लिम बांधव हजर होते. मोहल्ला समितीचे ०२ सदस्य, ०२ पोलीस मित्र असे सिंहगड रोड पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे उपस्थित होते.

